## महत्वाचे...

### गुंतवणुकीच्या आमिषाने ५३ लाखांचा गंडा

**पुणे । प्रतिनिधी**

आळंदी येथील ज्येष्ठ नागरिक शामकांत एकनाथ भवरिया (वय ६८, रिटायर्ड टाटा मोटर्स कर्मचारी) यांची तब्बल ५३ लाख २८ हजार २७ रुपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. मनोज धोंडोपंत फरकंडे (वय ३७, रा. तनिष सृष्टी, मरकळ रोड, खेड) याने स्वतःला बी.एम.ए. कंपनीचा एजंट असल्याचे सांगून भवरिया यांना डिमॅट खात्यात गुंतवणुकीस प्रवृत्त केले. बँकेपेक्षा जास्त परतावा मिळेल असे आमिष दाखवत बी.एम.ए. वेल्थ क्रिएटर्स लि. कोलकत्ता, अल्पारी इंटरनॅशनल ट्रेडिंग कंपनी, टी.पी. ग्लोबल, आय. एक्स. इंटरनॅशनल लि. अशा कंपन्यांचे शेअर्स खरेदी करण्यास भाग पाडले. त्यानंतर संबंधित कंपनी बंद झाली व गुंतवणुकीचा कोणताही परतावा न देता भवरिया यांची संपूर्ण रक्कम लाटली. या प्रकरणी अद्याप आरोपीला अटक झालेली नाही.

### नोकरीच्या आमिषाने २ लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

भोसरी येथे राजेश राकेश पासवान (रा. विजय चौक, गजानन महाराज मंदिर रोड, संभाजीनगर) याने स्वतः ला ग्रामसेवक असल्याचे सांगत दिपक मल्लिनाथ भोसले (वय ३४) यांची २ लाख रुपयांची फसवणूक केली. शासकीय नोकरी मिळवून देतो असे सांगून त्यांच्याकडून पैसे घेतले आणि खोटे नियुक्तीपत्र दाखवून विश्वास संपादन केला. मात्र नोकरी न देता भोसले यांची फसवणूक केल्याचे उघड झाले.

### उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा : प्रशांत कांबळे

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा पुणे व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या गुंडांनी कर्तव्य बजावत असलेल्या आयपीएस महिला अधिकारी अंजली कृष्णा यांना अवैध उत्खननावरील कारवाई दरम्यान धमकावल्याचा गंभीर प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणात अजित पवार यांनी पक्षातील गुंडांना अभय दिल्याचे व्हिडिओद्वारे स्पष्ट होत आहे. शासकीय महिला अधिकाऱ्याला धमकी देणे हा लोकशाहीला काळिमा फासणारा गुन्हा या प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नैतिकतेच्या आधारावर तात्काळ राजीनामा द्यावा तसेच संबंधित गुंडांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आम आदमी पार्टी पुणे शहराध्यक्ष प्रशांत कांबळे (सामाजिक न्याय) यांनी केली आहे. तसेच, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पोलिसांना आवश्यक कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशीही ठाम मागणी करण्यात आली आहे.

# पुरंदर विमानतळ साडेसात नाही, तर ३ हजार एकरातच होणार

## सरकारवर निर्णय बदलण्याची वेळ; शेती, घरे, झाडे, कोणत्या गोष्टींचा मिळणार मोबदला?



**पुणे । प्रतिनिधी**

पुरंदर विमानतळासाठी शेतकऱ्यांच्या विरोधामुळे साडेसात हजार एकराऐवजी तीन हजार एकर क्षेत्र संपादन करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे आता आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कार्गो विमानतळास साजेसे ठरणारे 'लॉजिस्टिक पार्क' मोठ्या जागेत करण्याचा निर्णय बदलण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. पुरंदर विमानतळ हे २,२०० एकरात आणि सुमारे ३०० ते ४०० एकर क्षेत्रातच 'लॉजिस्टिक पार्क' करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विमानतळासाठी शेतकऱ्यांकडून वेगाने संमती देण्यात येऊ लागली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा विरोधाचा सूर काहीसा मावळत असल्याचे पुरंदर तालुक्यात चित्र आहे. दिवसेंदिवस शेतकऱ्यांचा विरोध गळून पडत असल्याने जिल्हा प्रशासनाकडून भूसंपादनाच्या दिशेने एकेक पाऊल टाकले जात आहे.पूर्वी विमानतळासाठी २,६७३ हेक्टर म्हणजेच सुमारे साडेसात हजार एकर क्षेत्र संपादनाचा सरकारने निर्णय घेतला होता. मात्र, विरोधाचा सूर कायम राहिल्याने भूसंपादनाचे क्षेत्र कमी केले आहे. आता तीन हजार एकर क्षेत्र संपादित केले जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. पुरंदर विमानतळासाठी दोनच धावपट्ट्या करण्याचे नियोजन आहे. विमानतळासाठी सुमारे २,२०० एकर क्षेत्र असेल. त्यात कोणतीही तडजोड केली जाणार नाही. आता पूर्वीच्या प्रस्तावित संपादनाच्या क्षेत्रानुसार, 'लॉजिस्टिक पार्क' साठी मोठ्या प्रमाणात जागा घेण्याचे नियोजन होते. जागेचे क्षेत्रच कमी केल्याने आता सुमारे ३०० ते ४०० एकर क्षेत्रात पार्क उभारणार असल्याचे प्रशासनाने सांगितले. संमती देणाऱ्या शेतकऱ्यांना दर निश्चिती झाल्यानंतर जमिनीसह घर, झाडे, बागा, विहिरी यांच्यासाठीची मोबदल्याची रक्कम निश्चित केली जाईल. त्या संदर्भातील एकूण रक्कम थेट लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँकेच्या खात्यात जमा करण्यात येईल. ती रक्कम कोणाच्या हातात देण्यात येणार नाही. ही पूर्ण रक्कम हप्त्याने न देता एकाच वेळी जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना चिंता करण्याचे कारण राहणार नाही, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**एजंटच करतात दिशाभूल**

विमानतळास विरोध करणारे शेतकरी नसून, ते एजंटच असल्याचे जिल्हा प्रशासनाला मिळालेल्या गोपनीय माहितीतून समोर आले आहे. अनेक एजंट कमी दरात स्वतः जमिनी विकत घेऊन त्या जादा दराने गुंतवणूकदारांना विकत असल्याचे आढळले आहे. त्यामुळे एजंटांच्या संभ्रमाला बळी पडू नका, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले.

**प्रशासनाने कसली कंबर**

गेल्या अनेक वर्षांपासून विमानतळ होणार की नाही, या संभ्रमावस्थेत चित्र होते. आता विमानतळासाठी तालुक्यातील लोकप्रतिनिधी आणि राज्यातील राजकीय सत्ताधारी सकारात्मक आहेत. राजकीय इच्छेमुळे जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे; परंतु येथील शेतकऱ्यांनी विमानतळासाठी जमीन देऊ नये, यासाठी त्यांची दिशाभूल केली जात आहे.

## रेकॉर्डवरील आरोपीकडून देशी बनावटीचे दोन पिस्टल व दोन जिवंत राऊंड केले जप्त

गणेशोत्सव सुरू असल्यापासून वारजे माळवाडी परिसरात कोणतेही गंभीर गुन्हे घडू नये याकरीता वारजे पोलीसांकडून प्रयत्न सुरू होते. त्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजित काईंगडे यांचे मार्गदर्शनाखाली विशेष करून पोलीस उपनिरीक्षक संजय नरळे यांचे नेतृत्वात दोन पथक तैनात करून ती दिवस-रात्र वारजे माळवाडी पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये गस्त घालत होती. तसेच गुन्हेगारांवर वॉच ठेवण्याकरीता पेट्रोलिंग करत होते. गणेशोत्सव व विसर्जन मिरवणुकांपूर्वी कोणतेही गंभीर गुन्हे घडू नयेत किंवा छोट्या मोठ्या वादातून, जुन्या दुश्मनीतून टोळ्यांमध्ये कोणत्याही प्रकारे वाद उफाळून येऊन नयेत व त्याचे रुपांतर गंभीर घटनेमध्ये किंवा गुन्ह्यामध्ये घडू नये यासाठी सदरची पेट्रोलिंग आणखी सक्त करण्यात आली होती. गुरुवारी रात्री पोलीस कॉन्स्टेबल गणेश शिंदे व सत्यजित लोंढे यांना माहिती मिळाली की, सिंहगड रोड व भारती विद्यापिठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक गंभीर गुन्हे केलेला




व्यक्ती यश विनय शहा ( रा. देशपांडे गार्डन सोसायटी, नहे, पुणे) हा वारजे परिसरात फिरत आहे. त्याला गणेशोत्सवाच्या काळात परिमंडळ तीन च्या बाहेर निघून जाण्याचे कार्यकारी दंडाधिकारी परिमंडळ तीन यांनी आदेश काढलेले होते. असे असतांनाही सदरचा इसम हा अवैध अग्निशस्त्रासह वारजे परिसरात फिरत असल्याची बातमी मिळाल्यावर त्यांनी ती तातडीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजित काईंगडे तसेच तपास पथकाचे प्रभारी अधिकारी संजय नरळे यांना कळविली. त्यानंतर त्याला पकडण्यासाठी नियोजनबध्द सापळा रचण्यात आला व वारजे ब्रिज शेजारील, नवले ब्रिजकडे जाणाऱ्या सर्विसरोड येथे सदरचा यश विनय शहा हा येताच त्याचेवर झडप घालून त्याला शिताफिने पकडून त्याचेकडून देशी बनावटीचे एक पिस्टल व दोन जिवंत राऊंड जप्त करण्यात आले. त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याने त्याचेकडे अजून एक पिस्टल असल्याची माहिती दिली. त्यावरुन सदरचे दुसरे पिस्टल ही त्याचेकडून जप्त करण्यात आले आहे. विनय शहा ( वय २५ वर्षे, रा. देशपांडे गार्डन सोसायटी, डी-१, डी-२, तिसरा मजला, फ्लॅट नं. ३०१, नवले इंडस्ट्रिज) पुणे याचेविरूद्ध अग्नीशस्त्र बाळगले बाबत पोलीस कॉन्सटेबल गणेश शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वारजे माळवाडी पोलीस ठाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

## दुचाकी मालिकेतील आकर्षक क्रमांक चारचाकींसाठी ठेवता येणार राखून

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरू होत असून या मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक खासगी चारचाकी वाहनांसाठी देखील राखून ठेवता येणार आहेत. यासाठी संबंधित वाहन मालकांनी मूळ शुल्काच्या तीनपट रक्कम भरून अर्ज करणे आवश्यक आहे.

नव्याने सुरु होणाऱ्या दुचाकी मालिकेतील आकर्षक व पसंतीचे क्रमांक चारचाकींसाठी हव्या असलेल्या वाहनमालकांनी विहित नमुन्यात अर्ज करून ८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत कार्यालयात जमा करावेत. एखाद्या क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्याची यादी कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर लिलावासाठी धनाकर्ष (डीडी) ९ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारले जातील व दुपारी ४ वाजता सहकार सभागृहामध्ये लिलाव पार पडेल.

दुचाकी वाहनमालकांनी आकर्षक व पसंतीच्या क्रमांकासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ९ सप्टेंबर दुपारी २.३० वाजेपर्यंत आहे. एकाच क्रमांकासाठी जास्त अर्ज आल्यास त्याची यादी सूचना फलकावर प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर लिलावासाठी धनाकर्ष १० सप्टेंबर रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारले जातील व त्याच दिवशी दुपारी ४ वाजता सहकार सभागृहामध्ये लिलाव केला जाईल.

सर्व अर्ज खासगी वाहन नोंदणी विभागात 'आर.टी. ओ., पुणे' यांच्या नावे धनाकर्ष (डीडी), पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रती तसेच आधारकार्डाशी संलग्न मोबाईल क्रमांकासह जमा करावेत.

आकर्षक किंवा पसंतीचे क्रमांक आरक्षित करण्यासाठी तसेच अधिक माहितीसाठी https://fancy.parivahan.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.

## रेकॉर्डवरील आरोपींना पिस्तुलसह अटक

**पुणे । प्रतिनिधी**

सोमवार पेठ समर्थ व्यायाम शाळा पुणे येथ कुख्यात गुंड टिपु पठाण गँगमधील रेकॉर्डवरील आरोपी तालीम खान व युनुस खान उभे आहेत. त्यांचेकडे पिस्टल हे हत्यार असून ते कोणतातरी गंभीर स्वरुपाचा दखलपात्र गुन्हा करण्याची शक्यता आहे अशी पोलीसना माहिती मिळाली होती. गुन्हे शाखा, युनिट १ वरिष्ठ पोलीस निरीक्षक कुमार घाडगे यांनी पो-उपनिरी. राहुल मखरे यांना स्टाफसह मिळालेल्या बातमीची खात्री करुन कार्यवाही करण्यासाठी आदेश दिले.

त्यानंतर दोन नागरीकांना पंच म्हणून बोलावुन घेवुन पंच पोलीस स्टाफ असे मिळालेल्या बातमी ठिकाणी जावुन खात्री करण्यासाठी गेले. या ठिकाणी तालीम आस मोहंमद खान ऊर्फ आरिफ ( वय २४ वर्षे, सध्या रा. कुंजीरवाडी चौक, नर्सरी फार्म जवळ, लोणीकाळभोर ता. हवेली जि. पुणे ) व युनुस जलील खान ( वय २४ वर्षे, रा. गल्ली. नं.१६ ओ, सय्य्दनगर हडपसर) हे मिळुन आले. त्यांची पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता तालीम खान याचे ताब्यात एक ४०,०००/- रु. किं. ची. गावठी बनावटीची पिस्टल व २०००/- रु. कें. चे. एकुण ०२ जिवंत काडतुसे मिळुन आली. वर नमुद दोन्ही आरोपींवर पोलीस अंमलदार अनिकेत बाबर यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन समर्थ पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस उप निरीक्षक राहुल मखरे हे करित आहेत.

## अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एकाला जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा पुणे शहर कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना खडक पुणे येथील नशेमन बिल्डींग समोर एका ऑटो रिक्षामध्ये मुजम्मील वाजीद खान हा त्याचे एका साथीदारासह बसुन संशयितरित्या कोणाचीतरी वाट पाहत बसलेले असल्याचे दिसले. त्यांची हालचाल संशयास्पद वाटली.

तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार त्यांचे बाजुने जात असताना त्यांची व पोलीसांची नजरा नजर होताच सदर मुजम्मील वाजीद खान याचा साथीदार जोरात सिंहगड गॅरेज चौकाकडे पळुन गेला. मुजम्मील वाजीद खान यास जागीच पकडुन त्यास पळुन जाण्याचे कारण विचारता तो उडवा उडवीची उत्तरे देवु लागल्याने सदर इसमाची झडती घेतली असता आरोपी मुजम्मील वाजीद खान ( वय २५ वर्षे, रा. शिवनेरी नगर, दत्त बिल्डींग जवळ, कोंढवा खुर्द ) याचे ताब्यात सहा लाख ९८ हजार ८०० रु. कि.चे ऐवज त्यामध्ये पाच लाख ३३ हजार ८०० -रु.कि.चा, २६ ग्रॅम ६९ मिलीग्रॅम मेफेड्रोन (एम.डी.) हा अंमली पदार्थ, १५ हजार -रु.कि. चे दोन मोबाईल फोन, दीड लाख रु.किं.ची एक ऑटो रिक्षा, असा ऐवज मिळुन आला.

आरोपी कडे त्याचेकडुन जप्त करण्यात आलेल्या मेफेड्रोन (एम. डी) अंमली पदार्थ बाबत विचारपुस करता त्यास सदर मेफेड्रोन (एम.डी) हा अंमली पदार्थ त्याचा साथीदार याने विक्री करीता दिला असल्याचे सांगितले. या बाबत खडक पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ही अपर पोलीस आयुक्त पंकज देशमुख, पोलीस उप-आयुक्त निखील पिंगळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे २ . राजेन्द्र मुळीक यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, १ गुन्हे शाखा कडील पोलीस निरीक्षक प्रशांत अन्नछत्रे, सहा. पोलीस निरीक्षक अनिल सुरवसे, पोलीस उप निरीक्षक दिगंबर कोकाटे, पोलीस अंमलदार विशाल दळवी, मारुती पारधी, नागनाथ राख, सचिन माळवे, प्रविण उत्तेकर, संदिप शिर्के, विनायक साळवे, सर्जेराव सरगर, सुहास डोंगरे, दयानंद तेलंगे, विपुन गायकवाड, दत्ताराम जाधव, रेहाना शेख खडक पोलीस स्टेशन कडील पोलीस उप निरीक्षक कांबळे, व पोलीस अंमलदार पांडुळे यांनी केली आहे.


## घरगुती भारत गॅससिलेंडरमधुन अवैधरित्या गॅसचोरी करणाऱ्यांवर कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

वानवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील कर्मचारी हददीत पेट्रोलिंग करीत होते. तपास पथकाचे पोलीस अंमलदार अमोल पिलाणे व अभिजित चव्हाण यांना त्यांचे बातमीदारांमार्फतीने बातमी मिळाली की, सुर्यलोकनगरी सोसायटीतील गार्डनसमोर वैदवाडी, हडपसर, पुणे येथे एका तीन चाकी पॅगोमध्ये दोनजण हे घरगुती गॅसच्या टाक्यांमधून इतर रिकाम्या गॅसच्या टाक्यांमध्ये गॅस भरत असुन ते ज्वलनशिल व स्फोटक पदार्थ गैररित्याने हाताळुन मानवी जिवीतास धोका उत्पन्न होईल असे कृत्य करीत आहे.

तपास पथकातील कर्मचारी त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. तेथे एका पिवळ्या रंगाच्या पॅगो टेम्पोक्र. यामध्ये एकजण आतुन घरगुती सिलेंडर गॅसला एक दोन्ही बाजुने रेग्युलटर असलेला पॉईप जोडुन दुसरे टोक दुसऱ्याच्या हाताने दुसऱ्या गॅससिलेंडरला जोडुन त्याद्वारे गॅस ट्रान्सफर करुन चोरी करताना आढळुन आले. त्या आरोपीना आहे त्या परिस्थीतीत ठेवून, नमुद गॅस ट्रान्सफर करणारे त्यांचे नाव पत्ते विचारले असता, विशेष पाईपच्या साहाय्याने गॅस ट्रान्सफर करणारे पंकज किसन सिंग ठाकुर, ( वय २० वर्षे, रा. साडेसतरानगरळ अन्सारी फाटा, मांजरी)) प्रविण बंगाली रामकुमार ( वय-३५ वर्षे) असे सांगितले.

## राज्य पुरातत्व विभागाच्या सहाय्यक संचालकांना आली जाग, होळकर छत्री परिसरातील जागेच्या नकाशासह तयार केला प्रस्ताव




**पिंपरी । प्रतिनिधी**

खडकी येथील होळकर घराण्याच्या सरदारांच्या समाध्या ' होळकर छत्री' परिसरातील जागेच्या नकाशासह राज्य पुरातत्व विभागाच्या पुणे सहाय्यक संचालकांनी अखेर प्रस्ताव तयार केला. होळकर छत्री संरक्षित करून त्याचे संवर्धन करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला असल्याची माहिती पुरातत्व विभागाच्या पुणे सहाय्यक संचालक विलास वाहने यांनी सांगितले.

राज्य पुरातत्व विभागाच्या पुणे सहाय्यक संचालकांनी कोणतेही दस्ताऐवज न तपासता होळकर छत्री बाबत चुकीची व अर्धवट माहिती दिली होती. खडबडून जागे झालेल्या राज्य पुरातत्व विभागाच्या सहाय्यक संचालक कार्यालयाने संरक्षित 'होळकर छत्री' परिसराचा मोजमाप घेऊन नकाशे तयार केले. होळकर छत्री संरक्षित करून त्याचे संवर्धन करण्याचा प्रस्ताव तयार करून तातडीने राज्य सरकारला पाठविणार असल्याची माहिती विलास वाहने यांनी दिली.

इतिहास अभ्यासक समिर निकम यांनी राज्य पुरातत्व विभागाच्या सहाय्यक संचालक कार्यालयालस सैन्य दलाच्या मालमत्ता विभागातील होळकर छत्रीच्या जागेचे कागदपत्र, पुणे महापालिकेच्या हेरिटेज विभागातील गॅझेट, पूर्वीचे छायाचित्र नकाशे दिले. कार्यकर्त्यांनी ''लाक्षणिक उपोषण'' केले. या आंदोलनात राजमाता अहिल्यादेवी होळकर घराण्याचे वंशज भूषणसिंह होळकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

**खडकीतील शिवमंदिर १७६० मध्ये बांधल्याची नोंद**

'' राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा कार्यकाळ १७४२ ते १७९५ दरम्यानचा आहे. तर खडकी येथील शिवमंदिर अहिल्यादेवी यांनी १७६० मध्ये बांधल्याची नोंद आहे. तर त्यानंतर काही वर्षांनी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या वंशजाचे समाध्या बांधल्या गेल्या. मात्र, होळकर छत्री ऐतिहासिक वास्तूसाठी त्यांच्या वंशजांना संघर्ष करावे लागत असल्याची शोकांतिका आहे.

> होळकर छत्री या ऐतिहासिक वास्तूच्या संवर्धनाची बाब राज्य सरकारच्या निदर्शनास आणून दिली आहे. याबाबत सुरवातीला राज्य पुरातत्व विभागाच्या वतीने चुकीची माहिती दिली गेली होती. मात्र, पुरातत्व विभागाच्या सहाय्यक संचालकांना होळकर छत्रीच्या पुराव्याची सर्व कागदपत्रे दिली आहेत. ''
>
> – भूषणसिंह होळकर ,
> राजमाता अहिल्यादेवी होळकर घराण्याचे वंशज